**गोपनीय**

क्रमांक : का.स./बैठक/२१२

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : १८ ऑगस्ट, २००५.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १५ जुलै, २००५ (शुक्रवार) रोजी झालेल्या २१२ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

१८.८.२००५

सचिव,
कार्यकारी समिती

प्रति :

मुख्य सचिव, - अध्यक्ष
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

श्री.द.म.सुकथनकर, - सदस्य
"प्रिया", वरळी सी फेस, वरळी,
मुंबई - ४०० ०१८.

श्री.र.य.तांबे, - सदस्य
ए-६००, शिवम अपार्टमेंट्स,
सुरेंद्रनगर, आरपीटीएस रोड,
नागपूर - ४४० ०१५.

श्री. हरि शंकरन्, - सदस्य
कार्यकारी संचालक - इन्फ्रास्ट्रक्चर,
इन्फ्रास्ट्रक्चर लिजिंग अँड फिनान्सिअल सर्व्हिसेस लिमिटेड,
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

प्रधान सचिव (१), - सदस्य
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

महापालिका आयुक्त, - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१.

प्रधान सचिव, - सदस्य
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

व्यवस्थापकीय संचालक - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२३.

महानगर आयुक्त - सदस्य
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.

निमंत्रित :
प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (पर्यावरण),
उर्जा व पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रत अग्रेषित :-

विधी सल्लागार, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
# कार्यकारी समितीच्या २१२ व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | १५ जुलै, २००५ (शुक्रवार) |
| वेळ | : | सकाळी ११.३० वाजता |
| सभास्थान | : | मा.मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,<br>५ वा मजला, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. |

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री.रा.मे.प्रेमकुमार<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री.द.म.सुकथनकर | - | सदस्य |
| श्री.र.य.तांबे | - | सदस्य |
| श्री.रामानंद तिवारी<br>प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन | - | सदस्य |
| श्री.जॉनी जोसेफ<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री.एन.रामाराव<br>प्रधान सचिव,<br>गृहनिर्माण विभाग,<br>महाराष्ट्र शासन | - | सदस्य |
| श्री.अशोक सिन्हा<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको | - | सदस्य |
| डॉ.सुरेश जोशी<br>महानगर आयुक्त | - | सदस्य |

<u>निमंत्रित</u> :

श्री.व्ही.के.जयरथ
सचिव (उद्योग),
उद्योग व उर्जा विभाग,
महाराष्ट्र शासन

डॉ.टी. चंद्र शेखर
अतिरिक्त महानगर आयुक्त व प्रकल्प संचालक

श्री.जी.एन.वराडे
संचालक, पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन
(प्रधान सचिव, उर्जा व पर्यावरण विभाग यांचे प्रतिनिधी म्हणून)

श्री.के.एन.पटेल
विधी सल्लागार,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.सुरेश परदेशी
मुख्य लेखा अधिकारी व वित्तीय सल्लागार,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.अ.वि.देशिंगकर
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.पी.आर.के.मुर्ती
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.यु.व्ही.लुकतुके
प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

कु.उमा अड्सुमली
प्रमुख, नियोजन विभाग
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.प्र.ह.राऊत
सचिव, कार्यकारी समिती,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

**<u>बाब क्र.१</u> : <u>प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २४ मार्च, २००५ रोजी झालेल्या २११ व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.</u>**

१.१ बैठकीचे कार्यवृत्त कायम करताना महानगर आयुक्त यांनी सांगितले की, **बाब क्र.९ : मुंबई** नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प-छत्रपती शिवाजी विमानतळ, डोमेस्टिक टर्मिनल येथे पश्चिम द्रुतगती महामार्गावर उड्डाणपूलाच्या उभारणीकरीता संकल्पचित्र तयार करण्याकरीता व प्रकल्प व्यवस्थापनाकरीता मेसर्स डार कन्सल्टंटस् यांची महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळातर्फे नेमणूक करण्याबाबत, च्या कार्यवृत्तासंबंधात श्री.र.य.तांबे, सदस्य, कार्यकारी समिती यांनी पत्राद्वारे असे सूचविले आहे की, कार्यवृत्ताच्या परिच्छेद क्र.९.१ व ९.२ दरम्यान किंवा इतरत्र कोठेही पुढील वाक्य समाविष्ट करावे – "During the discussions it was also noted that the cost and other implications of building a "Signature Bridge" were not given."

या सूचनेस मान्यता देऊन कार्यकारी समितीने असे ठरविले की, कार्यवृत्ताच्या परिच्छेद क्र. ९.२ मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात यावी – "यासंबंधात चर्चा करताना नोंद घेण्यात आली की, संस्मरणीय उड्डाणपूल बांधण्याचा खर्च व इतर अपेक्षित परिणाम याची माहिती उपलब्ध नाही. त्यानंतर कार्यकारी समितीने असे ठरविले की, मेसर्स डार कन्सल्टंटस् यांना बांधकाम खर्चाच्या ५.५०% अधिक सेवाकर इतकी फी न देता, इतर सल्लागारांप्रमाणेच ३.५% अधिक सेवाकर इतकी फी मेसर्स डार कन्सल्टंटस् यांना मान्य असल्यास त्यांची संकल्पचित्र तयार करण्याकरीता व प्रकल्प व्यवस्थापनाकरीता सोल सोअर्स बेसीसवर नेमणूक करण्यात यावी. अन्यथा कार्यकारी समितीने मंजूर केलेल्या सल्लागारांच्या संक्षिप्त यादीतून विहित फी वर अन्य सल्लागाराची नेमणूक करण्यात यावी."

१.२ वरील सुधारणेसह कार्यवृत्त कायम करण्यात आले.

## बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २४ मार्च, २००५ रोजी झालेल्या २११ व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.

२.१ कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवालासंबंधात खालीलप्रमाणे चर्चा झाली :—

### बाब क्र. ४ : वांद्रे-कुर्ला जोडरस्ता व इतर अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरणाच्या कामासाठीच्या लघुत्तम निविदेस मंजूरी.

मुंबईतील रस्त्याच्या डांबरीकरणासाठी डांबरामध्ये प्लॅस्टीक पिशव्यांची भर घालण्याच्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यासंबंधात श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी विचारणा केली असता प्राधिकरणाचे मुख्य अभियंता यांनी सांगितले की, अशा प्रकारच्या तंत्रज्ञानाचा वापर बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे दोन रस्त्यांवर करण्यात येत आहे. यासंबंधी तांत्रिक माहिती घेण्यात येत आहे. त्यानंतर तांत्रिक तपशिलाचा अभ्यास करुन त्याच्या वापराबाबतचा निर्णय पुढील प्रस्ताव मागविण्यापूर्वी घेण्यात येईल.

### बाब क्र.९ : मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्प — छत्रपती शिवाजी विमानतळ, डोमेस्टिक टर्मिनल येथे पश्चिम द्रुतगती महामार्गावर उड्डाणपुलाच्या उभारणीकरीता संकल्पचित्र तयार करण्याकरीता व प्रकल्प व्यवस्थापनाकरीता मेसर्स डार कन्सल्टंट्स यांची महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळातर्फे नेमणूक करण्याबाबत.

अतिरिक्त महानगर आयुक्त व प्रकल्प संचालक यांनी सांगितले की, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने आता असे कळविले आहे की, ३.५% अधिक सेवाकर इतक्या फी वर काम करण्यास मेसर्स डार कन्सल्टंट्स यांनी असमर्थता व्यक्त केली आहे. म्हणून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ सदर कामासाठी मेसर्स टेक्नोजेम या सल्लागारांकडे विचारणा करीत आहे. मेसर्स टेक्नोजेम या सल्लागारांची सदर कामासाठी नेमणूक करण्यास यापूर्वीच मान्यता दिली होती.

### बाब क्र.१३ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाची माहिती सर्वसामान्य नागरिक व प्रकल्पग्रस्तांपर्यंत प्रभाविरित्या पोहचविण्याकरीता जनसंपर्क सल्लागार संस्थेची नियुक्ती करणे.

मे.क्लिया पब्लिक रिलेशन प्रा. लि. या नियुक्त केलेल्या सल्लागार संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक श्री.विनोद नायर यांनी सदर संस्थेने करावयाच्या कामासंबंधी सादरीकरण केले.

त्यावेळेस अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, सदर संस्थेने इतरांबरोबरच, स्थानिक नगरसेवक / आमदार यांचेशीसुध्दा मुंबई नागरी परिवहन प्रकल्पासंबंधात चर्चा करावी.

२.२ त्यानंतर, कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

<u>बाब क्र.३ :</u> **<u>मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत मौजे मजास येथील भूखंड क्र.१९०/अ/६/१ येथे प्रकल्पग्रस्तांकरीता कायमस्वरुपी घरबांधणी प्रकल्पासाठी नियुक्त केलेल्या सल्लागाराच्या अतिरिक्त कामाच्या शुल्कास मंजूरी मिळणेबाबत.</u>**

३.१ या बाब टिप्पणीबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पामुळे बाधित होणा-या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी मौजे मजास येथे निवासी गाळे, दुकाने व सुविधा गाळयांचे बांधकाम दिनांक ७ फेब्रुवारी, २००३ पासून हाती घेण्यात आले. कामाचा कालावधी २० महिने इतका होता. जागतिक बँकेच्या निकषानुसार जाहिररित्या निविदा मागवून सदर बांधकामाच्या देखरेखीकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मे.दलाल कन्सल्टंट्स व इंजिनिअर्स यांची नेमणूक करण्यात आली. त्याप्रमाणे काम प्रगतीपथावर होते. मात्र इमारतीच्या उंचीबाबत भारतीय विमानतळ प्राधिकरणाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त होण्यास बराच कालावधी लागला. परिणामी बांधकामाची अपेक्षित प्रगती साध्य होऊ शकली नाही. तसेच एकूण १५ पैकी २ इमारतींसाठी प्रस्तावित खुल्या पध्दतीच्या पायाऐवजी पाईल पध्दतीच्या पायाचे काम करावे लागले व त्यासाठी जास्त कालावधी लागला. परिणामी काम प्रगतीपथावर असताना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांच्या सेवा पुढे वाढविणे आवश्यक ठरले. आतापर्यंत सदरील काम जवळजवळ पूर्ण झाले असून वाढीव कालावधीपोटी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांना रु.७.२२ लाख (सेवा करासह) इतकी रक्कम देय होते. सदरील वाढ ही मूळ मंजूर रक्कमेच्या १५% पेक्षा कमी असल्याने या प्रकरणी जागतिक बँकेची पूर्व मान्यता आवश्यक नाही. या प्रकरणी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची नेमणूक ही मनुष्य-महिने (Man-month) पध्दतीवर असून वाढीव मुदतीत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराने करावयाच्या अतिरिक्त कामाचे शुल्क म्हणून रु.७.२२ लाख अदा करण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या कार्योत्तर मंजूरीसाठी सादर केला आहे.

३.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.९६१</u> :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (दोन) व (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मे.दलाल कन्सल्टंटस् व इंजिनिअर्स लिमिटेड यांना मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत मौजे मजास येथे भूखंड क्र.१९०अ/६/१ वर प्रकल्पग्रस्तांकरीता करण्यात येणा-या कायमस्वरुपी घरबांधणी प्रकल्पासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून वाढीव मुदतीत करावयाच्या अतिरिक्त कामाचे शुल्क म्हणून रु.७.२२ लाख (सेवा करांसह) देण्यास कार्योत्तर मंजूरी देत आहे."

**<u>बाब क्र.४</u> : <u>मुंबई नागरी परिवहन प्रकल्प व मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत प्रकल्पग्रस्तांसाठी बांधण्यात येणा-या कायमस्वरुपी निवासी गाळयांसाठी बाह्य पायाभूत सुविधांच्या (जलकुंभ व उदंचन केंद्र बांधणे) अंदाजित खर्चास मंजूरी मिळणेबाबत.</u>**

४.१ या प्रस्तावासंबंधात माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्प व मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या अंमलबजावणीमुळे बाधित होणा-या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी अणिक-चेंबूर, माहूल-चेंबूर व मानखुर्द आदी ठिकाणी निवासी गाळे / दुकाने बांधण्याची कामे हाती घेण्यात आली आहेत. या बांधकामाच्या ठिकाणापर्यंत पोहचण्यासाठी आवश्यक त्या रस्त्यांचे बांधकाम, जलवाहिन्या / मलनिःस्सारण वाहिन्या टाकणे आदी बाहय पायाभूत सुविधांची कामे करण्यासाठी उपविकासकाकडून रु.५६० प्रति चौ.मी. वसूल करण्यात येतात व या उपलब्ध निधीतून बृहन्मुंबई महानगरपालिकेने अशी आवश्यक कामे पूर्ण करणे अभिप्रेत आहे. तथापि, सदरील कामांची निकड व ती वेळीच पूर्ण करण्याबाबतचे नियोजन आदी विचारात घेऊन बृहन्मुंबई महानगरपालिकेने सदरील बाहय पायाभूत सुविधांची कामे या प्राधिकरणाने करावी असे सुचविले. त्या अनुषंगाने व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित अधिका-यांनी दिलेल्या शे-यास अनुसरुन अणिक, माहूल आदी ठिकाणच्या सदनिकांना पाणीपुरवठा करण्यासाठी महापालिकेच्या ट्रॉम्बे येथील निम्न जलाशयाच्या शेजारी

एक पंपगृहाचे बांधकाम करावयाचे आहे. तसेच माहूल येथे उच्चस्तरीय जलवितरण टाकीचे बांधकाम करावयाचे आहे. त्याचा प्रत्येकी खर्च रु.३ कोटी आहे. सदरील प्रकल्प बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शे-यानुसार तयार करण्यात आले असून हा खर्च उपविकासकाकडून मिळणा-या रक्कमेतून भागवावयाचा आहे. सदर बाब टिप्पणी प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यासाठी सादर करण्यात आली असून त्यानंतर सार्वजनिकरित्या निविदा मागवून ही बांधकामे हाती घेण्याचा प्रस्ताव आहे.

४.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.९६२</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी परिवहन प्रकल्प व मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेली उच्चस्तरीय जलकुंभ बांधणे व उदंचन केंद्र बांधणे ही कामे पूर्ण करण्यासाठी रु.६.०० कोटीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देत आहे. सदर खर्च उपविकासकांकडून झोपडपट्टी पुनर्विकास नियमाप्रमाणे उपलब्ध होणा-या निधीतून करण्यात यावा. प्राधिकरणाने याकरीता आपल्या निधीतून खर्च करु नये.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई नागरी परिवहन प्रकल्प व मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पुनर्वसन प्रकल्पांना लागणा-या पायाभूत सुविधांची कामे प्रचलित नियमानुसार हाती घेण्यास व त्यावर वेळोवेळी होणा-या खर्चाला मान्यता देण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

<u>बाब क्र.५</u> : **<u>मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत रस्त्यांची कामे - रस्त्यालगतच्या जलवाहिनी टाकण्याच्या भाग ५ व भाग ६ च्या कामासाठी प्रशासकीय मंजूरी तसेच भाग ५ व भाग ६ च्या लघुत्तम निविदांना मंजूरी मिळणेबाबत.</u>**

५.१ या बाब टिप्पणीबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, या प्राधिकरणामार्फत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत हाती घेतलेल्या रस्ते सुधारण्याच्या कामांमध्ये

सध्याच्या डांबरी पृष्ठभागाऐवजी कॉंक्रीट पृष्ठभाग करणे अंतर्भूत आहे. या रस्त्यांलगत असलेल्या जुन्या जलवाहिन्या व त्यावरील जोडण्या यांचे स्थलांतर तातडीने करणे आवश्यक आहे. ही कामे बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून उपलब्ध झालेल्या शे-यानुसार करावयाची आहेत. या दृष्टीकोनातून चार भागात अंदाजपत्रके तयार करुन या कामांना कार्यकारी समितीची प्रशासकीय मान्यता घेण्यात आली होती. तथापि, या कामांमध्ये लालबहादूर शास्त्री मार्ग येथे टाकावयाच्या जलवाहिन्यांच्या अंदाजे रु.१७ कोटी खर्चाच्या कामांचा अंतर्भाव नव्हता. सदरचे अंदाजपत्रक बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दरपत्रकानुसार तयार केले असून त्यांचेकडून तपासून घेतले आहे. त्यानुसार एकूण रु.१७ कोटीच्या वाढीव खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता घेण्यासाठी आता प्रस्ताव सादर केला आहे. सदरील खर्च मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या तरतूदीतून करावयाचा आहे. तसेच या अनुषंगाने मुंबईच्या पूर्व व पश्चिम उपनगरातील जलवाहिनी टाकण्याच्या कामाचा भाग-५ व भाग-६ या प्रत्येकी सुमारे रु.५ कोटी अंदाजित खर्चाच्या कामांसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार मे.ईगल कन्स्ट्रक्शन कंपनी यांचा अनुक्रमे ८.०१% कमी दराचा व ९.०९% कमी दराचा देकार हे प्रथम लघुत्तम देकार असून निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारे असल्याने कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहेत.

५.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.९६३</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेल्या मुंबईतील लालबहादूर शास्त्री मार्ग येथे जलवाहिनी टाकण्याच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या एकूण रु.१७ कोटीच्या

वाढीव खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देत आहे. तसेच भाग-५ व भाग-६ करीता खाली दर्शविलेल्या तक्त्याप्रमाणे लघुत्तम निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | ठेकेदाराचे नांव | लघुत्तम दर व त्याप्रमाणे किंमत |
|---|---|---|---|
| १. | मुंबई शहरातील पूर्व व पश्चिम उपनगरातील जलवाहिनी टाकण्याचे काम - भाग - ५ | मे.ईगल कन्स्ट्रक्शन कंपनी | ८.०१% कमी दराने (रु.४,५९,९५,०००/-) |
| २. | मुंबई शहरातील पूर्व व पश्चिम उपनगरातील जलवाहिनी टाकण्याचे काम - भाग - ६ | मे.ईगल कन्स्ट्रक्शन कंपनी | ९.०९% कमी दराने (रु.४,५४,५५,०००/-) |

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.६ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत प्रकल्पग्रस्तांसाठी बांधण्यात येणा-या कायमस्वरुपी निवासी गाळयांसाठी रस्ते बांधण्याच्या कामांच्या लघुत्तम निविदांना मंजूरी मिळणेबाबत.**

६.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पामुळे बाधित होणा-या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी माहूल-चेंबूर परिसरात सदनिकांची बांधकामे जवळपास पूर्ण करण्यात आली असून या सदनिकांच्या ठिकाणापर्यंत जाणा-या विकास आराखडयातील रस्त्याची सुधारणा करणे आवश्यक आहे. यावरील खर्च हा उपविकासकाकडून झोपडपट्टी पुनर्विकास नियमाप्रमाणे उपलब्ध होणा-या निधीतून करावयाचा आहे. माहूल-चेंबूर येथील बी.डी.पाटील मार्गापासून सदनिकांपर्यंत जाणा-या सदरील रस्त्याची रुंदी १८.३ मीटर असून यामध्ये रस्त्याच्या कडेची गटारे, पदपथ व डांबरी पृष्ठभागाची कामे पूर्ण करणे प्रस्तावित आहे. याप्रमाणे सविस्तर अंदाजपत्रके तयार करुन सार्वजनिकरित्या निविदा मागविण्यात आल्या होत्या व प्राप्त तीन निविदांपैकी लघुत्तम निविदाकाराबरोबर वाटाघाटी करुन त्यांचा मूळ १८.१८% कमी दराचा देकार १८.८१% असा कमी करुन घेण्यात आला. या लघुत्तम देकारास मंजूरी देण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.

६.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.९६४ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत प्रकल्पग्रस्तांसाठी बांधण्यात येणा-या कायमस्वरुपी निवासी गाळयांसाठी पूर्व आणि पश्चिम उपनगरात रस्ते बांधण्याच्या कामासाठी मे.रिलायन्स कन्स्ट्रक्शन कंपनी यांची लघुत्तम निविदा जी कामाच्या अंदाजित खर्चाच्या १८.८१ टक्क्यांनी कमी म्हणजेच रु.२,८४,१६,५००/- (रुपये दोन कोटी चौ-यांशी लाख सोळा हजार पाचशे मात्र) इतकी आहे ती स्विकारण्यास मान्यता देत आहे. उपविकासकाकडून झोपडपट्टी पुनर्वसन विकास नियमाप्रमाणे उपलब्ध होणा-या निधीतून सदर खर्च करण्यात यावा. प्राधिकरणाने याकरीता आपल्या निधीतून खर्च करु नये.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.७ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत (पर्याब-ब) हस्तांतरणीय विकास हक्क (टीडीआर) व रोख रक्कमेसहित भूसंपादन व बांधलेल्या सदनिका संपादन करणेसाठी प्राप्त निविदाकारांची निवड करणेबाबत - प्रधान महालेखाधिकारी (Principal Accountant General) यांचा लेखा आक्षेप परिच्छेद (Audit Para).**

७.१ या बाब टिप्पणीबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी खाजगी विकासकाकडून हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) अधिक रोख रक्कमेच्या मोबदल्यात त्यांच्या जमिनीसहित सदनिका बांधून संपादन करणे या पर्यायानुसार प्राधिकरणाची मान्यता घेऊन चार विकासकांना कार्यादेश देण्यात आले होते व त्याप्रमाणे विकासकांना रोख रक्कम देण्यात आली. तथापि, महालेखाधिकारी (Accountant General) यांनी लेखा परिक्षा करताना यासंबंधात आक्षेप घेऊन कळविले की विकास नियंत्रण नियमामधील तरतूदीप्रमाणे रोख

रक्कमेसहीत हस्तांतरणीय विकास हक्क प्राधिकरण मंजूर करु शकत नाही. यासंबंधात महाअधिवक्ता (Advocate General), महाराष्ट्र शासन यांचे मत मागविले असता त्यांनी असे स्पष्ट केले की, प्राधिकरणाच्या निविदेमध्ये हस्तांतरणीय विकास हक्क व त्यावर रोख रक्कमेचा समावेश असल्यामुळे विकास नियंत्रण नियमाचे उल्लंघन होत नाही. याप्रमाणे लेखा आक्षेपाला उत्तर दिले असता प्रधान महालेखाधिकारी यांनी प्राधिकरणाचे उत्तर मान्य केले नाही. सदर बाब प्राधिकरणाच्या विधी सल्लागारांनी तपासून असे मत दिले की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमानुसार प्राधिकरणाने हस्तांतरणीय विकास हक्काच्या प्रक्रियेस दिलेली मंजूरी योग्य आहे. प्राधिकरणाच्या विधी सल्लागारांच्या या मतास कार्यकारी समितीने मान्यता द्यावी असा प्रस्ताव आता सादर करण्यात आला आहे.

७.२ चर्चेच्या दरम्यान प्राधिकरणाच्या विधी सल्लागारांनी असे स्पष्ट केले की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाच्या कलम १२६ मधील तरतूदीप्रमाणे एखादया विकासकाकडून जागेसह तयार सदनिका घ्यावयाच्या असतील तर विकास हक्काव्यतिरिक्त रोख रक्कम देणेबाबत कोणतेही निर्बंध नाहीत व त्यामुळे प्राधिकरणाने केलेल्या कार्यवाहीत कोणतीही त्रुटी आढळून येत नाही. या अनुषंगाने महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, अशा प्रकारच्या प्रस्तावांची व्यवहार्यता त्या त्या वेळी बाजारात असणा-या विकास हक्काच्या दरावर अवलंबून असते. शिवाय याबाबतच्या निविदा प्राधिकरणाने मंजूर करण्यापूर्वी एकूण दोन वेळा निविदा मागविण्यात आल्या होत्या. तथापि, त्या तीनही निविदांप्रमाणे विकासकांनी फक्त विकास हक्कापोटी जमीन व सदनिका देण्याचा प्रस्ताव सादर केला नाही. शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित या संस्थेलासुध्दा सुरुवातीच्या कालावधीत फक्त विकास हक्कापोटी जमीन व सदनिका देण्यास विकासकांचे पुरेसे प्रस्ताव प्राप्त न झाल्यामुळे विकास हक्काशिवाय काही अन्य उपाययोजना करावी लागली होती.

७.३ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :–

<u>ठराव क्र.९६५</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ च्या उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) नुसार प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे बाब टिप्पणीच्या परिच्छेद ६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे खाजगी विकासकाकडून हस्तांतरणीय विकास हक्क अधिक

रोख रक्कमेच्या मोबदल्यात जमिनीसहित सदनिका बांधून संपादन करणे या पर्यायानुसार मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनासाठी सदनिका संपादन करण्यासंबंधात प्राधिकरणाने दिलेली मंजूरी योग्य आहे या प्राधिकरणाच्या विधी सल्लागारांनी दिलेल्या कायदेविषयक मतास मान्यता देत आहे."

**<u>बाब क्र.८</u> : <u>महाराष्ट्र शासन, वित्त विभागास ठेवी देण्याबाबत.</u>**

८.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, राज्य शासनाच्या वित्त विभागाने दिनांक २६ एप्रिल, २००५ च्या पत्रान्वये अशी विनंती केली होती की, राज्याची अर्थोपाय स्थिती समाधानकारक नसल्यामुळे रिझर्व्ह बँकेकडून अधिकर्ष घ्यावा लागलेला असून या अडचणीतून मार्ग काढण्यासाठी तात्पुरती व्यवस्था म्हणून प्राधिकरणाने रु.१००० कोटी राज्य शासनास तातडीने उपलब्ध करुन द्यावेत. यासंबंधात मा.मुख्य सचिव व मा. मुख्यमंत्री यांनी रु.५०० कोटी इतकी रक्कम शासनास देण्यास नस्तीवर मंजूरी दिली आहे. सदर रक्कमेची परतफेड व व्याज याबाबतच्या शासनाने कळविलेल्या अटी व शर्ती बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे आहेत. शासनाच्या आदेशानुसार रु.४० कोटी इतकी रक्कम ठेव म्हणून मे, २००५ च्या तिस-या आठवडयात प्राधिकरणाने अदा केलेली आहे. सदर ठेव रक्कम शासनाच्या वित्त विभागाने दिनांक ५ जुलै, २००५ रोजी परत केलेली आहे, मात्र त्यावरील व्याज शासनाने अदा केलेले नाही.

८.२ यासंबंधात चर्चा करताना श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे सुचविले की, ज्या शासकीय संस्थांनी प्राधिकरणाच्या ठेवी/कर्जे वेळेवर परत केलेली नाहीत त्यांना पुन्हा ठेवी/कर्जे देऊ नयेत असा निर्णय यापूर्वी कार्यकारी समितीने घेतला आहे. ज्या संस्थांनी प्राधिकरणाच्या ठेवी/कर्जे वेळेवर परत केलेली नाहीत त्यांना कार्यकारी समितीच्या पूर्व मंजूरीशिवाय हयापुढे ठेव/कर्जे देऊ नयेत. या सूचनेस कार्यकारी समितीने मान्यता दिली.

८.३ त्यानंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.९६६</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मा.मुख्य सचिव व मा.मुख्यमंत्री यांच्या आदेशानुसार प्राधिकरणाने रु.४० कोटी इतकी रक्कम शासनाच्या वित्त विभागास मे, २००५ मध्ये सुमारे दीड

महिन्याकरीता ६.७५% व्याजदराने ठेव म्हणून दिली होती. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (पाच) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे सदर ठेव इतर अटी व शर्तीवर देण्यास कार्योत्तर मंजूरी देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरणाची नोंदणी आयकर कायद्याखाली 'ट्रस्ट" म्हणून करण्यात आली आहे. यामुळे शासनाकडे ठेव स्वरुपात निधी गुंतविता येईल किंवा कसे याबाबत आयकर विभागाचा स्वतंत्रपणे सल्ला तीन महिन्यात वित्त विभागाने घ्यावा व प्राधिकरणास कळवावा, जेणेकरुन प्राधिकरणाच्या गुंतवणूकीवर आयकर विभागाकडून आक्षेप येणार नाहीत व प्राधिकरणास आयकरातून सूट मिळू शकेल.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** ज्या शासकीय संस्थांनी प्राधिकरणाच्या ठेवी/कर्जे वेळेवर परत केलेली नाहीत त्यांना पुन्हा ठेवी/कर्जे देऊ नयेत असा निर्णय हयापूर्वी कार्यकारी समितीने घेतला होता. शासनाच्या वित्त विभागाने प्राधिकरणाची ठेव परत केलेली नाही. शासनास निधीची आवश्यकता असल्यामुळे हयापूर्वी कार्यकारी समितीने घेतलेला निर्णय शासनाला देण्यात आलेल्या या रु.४० कोटीच्या नविन ठेवीपुरता शिथिल करण्यात यावा. ज्या संस्थांनी प्राधिकरणाच्या ठेवी/कर्जे वेळेवर परत केलेली नाहीत त्यांना कार्यकारी समितीच्या पूर्व मंजूरीशिवाय ठेवी/कर्जे देऊ नयेत."

**बाब क्र.९ : प्राधिकरणाकडील असलेला अतिरीक्त निधीचा गुंतवणूक अहवाल - दिनांक १ मार्च, २००५ ते ३० जून, २००५.**

यासंबंधात श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, प्राधिकरणाकडील अतिरिक्त निधी वित्तीय संस्था तसेच वाणिज्यिक बँकेत १२ महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी गुंतविण्यासंबधात शासनाकडे पाठपुरावा करण्यात यावा.

त्यानंतर, दिनांक १ मार्च, २००५ ते दिनांक ३० जून, २००५ पर्यंतच्या प्राधिकरणाकडील अतिरिक्त निधीच्या गुंतवणूक अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.१० : मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी : तिमाही व्यवस्थापन अहवाल – दिनांक १ जानेवारी, २००५ ते दिनांक ३१ मार्च, २००५**

मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधीच्या दिनांक १ जानेवारी, २००५ ते दिनांक ३१ मार्च, २००५ पर्यंतच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.११ : मुं.म.प्र.वि.प्राधिकरणातर्फे हाती घेतल्या जाणा-या प्रकल्पांसाठी सल्लागार निवडीच्या प्रक्रियेमध्ये तज्ज्ञांना द्यावयाच्या मानधनाबाबत.**

११.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, शासनाने गोराई-मनोरी-उत्तन क्षेत्राच्या मनोरंजन व पर्यटन विकासासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्रधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक केली आहे. सदर क्षेत्राचा आराखडा बनविण्यासाठी सल्लागारांची नेमणूक करण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली आहे. या प्रकल्पाव्यतिरिक्त जे इतर प्रकल्प प्राधिकरणामार्फत राबविण्यात येतात त्यासाठी वेळोवेळी सल्लागारांची नेमणूक करण्याची आवश्यकता असते. अशी नेमणूक, सल्लागार संस्थांकडून प्रस्ताव मागवून व त्यांचे मूल्यमापन करुन करण्यात येते. सल्लागार निवडीच्या प्रक्रियेनुसार सल्लागारांनी तांत्रिक व आर्थिक प्रस्ताव प्राधिकरणाला सादर करावयाचे असतात. अशा प्रकारच्या तांत्रिक प्रस्तावांचे मूल्यमापन वस्तुनिष्ठ व पारदर्शक पध्दतीने करण्यासाठी प्राधिकरणाच्या अधिका-यांव्यतिरिक्त प्राधिकरणाबाहेरील शासकीय व अशासकीय अनुभवी तज्ज्ञांची मूल्यमापन समितीवर नियुक्ती करण्यात येते. अशा अशासकीय तज्ज्ञांना मूल्यमापनासाठी बराच वेळ द्यावा लागतो. त्यासाठी त्यांचे संबंधित क्षेत्रातील स्थान व त्यांचा अमूल्य वेळ लक्षात घेता त्यांना योग्य ते मानधन देणे आवश्यक असते, अन्यथा तांत्रिक प्रस्तावांचे मूल्यमापन करण्यास चांगले तज्ज्ञ तयार होत नाहीत. सध्या प्राधिकरणातर्फे त्यांना प्रत्येक बैठकीसाठी केवळ रु.३००/- व प्रत्यक्ष प्रवास खर्च दिला जातो. मात्र इतर महामंडळे सल्लागारांना प्रत्येक बैठकीमागे रु.२,०००/- असे मानधन व प्रवास खर्च देतात. म्हणून प्राधिकरणाने हाती घेतलेल्या प्रकल्पांसाठी सल्लागारांच्या निवड प्रक्रियेमध्ये नियुक्त केल्या जाणा-या किंवा इतर प्रकल्पांसाठीही तज्ज्ञांची आवश्यकता भासल्यास प्राधिकरणाबाहेरील अशासकीय तज्ज्ञांना प्रत्येक बैठकीसाठी रु.२,०००/- असे मानधन व प्रत्यक्ष प्रवास खर्च देण्यात यावा असा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.

११.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.९६७ :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे प्राधिकरणाच्या प्रकल्पांसाठी सल्लागारांच्या निवडीच्या प्रक्रियेसाठी नियुक्त केल्या जाणा-या किंवा इतर प्रकल्पांसाठीही तज्ञांची आवश्यकता भासल्यास प्राधिकरणाबाहेरील अशासकीय तज्ञांना यापुढे प्रत्येक बैठकीसाठी रु.२,०००/- (रु.दोन हजार मात्र) असे मानधन व प्रत्यक्ष प्रवास खर्च देण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र.१२ : **मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (MUIP) - महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने प्राधान्यक्रमाने हाती घेतलेल्या उड्डाणपूलांच्या लघुत्तम निविदांना मान्यता देणेबाबत.**

१२.१ या प्रस्तावासंबंधात माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत बांधावयाच्या उड्डाणपूलांपैकी ९ उड्डाणपूलांसाठी, कार्यकारी समितीच्या मान्यतेने, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची प्रकल्प अंमलबजावणी संस्था म्हणून नियुक्ती केलेली आहे. यापैकी ६ उड्डाणपूलांच्या कामांसाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने सविस्तर अंदाजपत्रके तयार करुन, त्यास मंजूरी देऊन, सार्वजनिकरित्या निविदा मागविल्या. प्राप्त निविदांची छाननी करुन शिफारशीसह निविदा मंजूरीचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने प्राधिकरणाकडे पाठविला. निविदेतील अटींप्रमाणे कोणत्याही एका निविदाकारास दोन पेक्षा अधिक

उड्डाणपूलांची कामे न देण्याची अट घातली आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाचा सविस्तर अभ्यास करुन व प्रकल्पाचा खर्च कमी करण्यासाठी प्रस्तावात सुयोग्य बदल करणे तसेच संबंधित लघुत्तम व अन्य निविदाकारांच्या समवेत वाटाघाटी करुन त्यांचे मूळ देकार कमी करुन घेण्याची निकड स्पष्ट झाली. त्यानुसार प्रस्तावात सुयोग्य बदल करण्यात आले व वाटाघाटीने देकारही कमी करण्यात आले. परिणामी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने सादर केलेल्या प्रस्तावित खर्चात सुमारे रु.४.७५ कोटीची बचत करणे शक्य झाले. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, ५ निविदाकारांचे देकार निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारे असल्याने संवादी आहेत व त्यानुसार या निविदांना मंजूरी देण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीस सादर केला आहे. मात्र बर्फीवाला लेन येथील उड्डाणपूलाच्या कामासाठी प्राप्त झालेला देकार अंदाजपत्रकीय खर्चापेक्षा जास्त असल्याने सदर कामासाठी फेरनिविदा मागविणे उचित होईल.

१२.२ चर्चेच्या दरम्यान प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी अशी विचारणा केली की, मूळ निविदा सूचीप्रमाणे जॉईंट व्हेंचर कंपनीला निविदा भरण्यासाठी अपात्र केले होते तर शुध्दीपत्राप्रमाणे त्यांना पात्र केले हा बदल सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणला होता काय ? या अनुषंगाने प्राधिकरणाचे मुख्य अभियंता यांनी स्पष्ट केले की, सदर बाबीची शुध्दीपत्रकाप्रमाणे वृत्तपत्रीय प्रसिध्दी देण्यात आली होती व निविदेसोबत या शुध्दीपत्रकाची प्रत सर्व निविदाकारांना देण्यात आली होती.

१२.३ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.९६८</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (दोन) व (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे

खालील दर्शविलेल्या तक्त्यानुसार निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे :-

| अ. क्र. | उड्डाणपुलाचे ठिकाण | मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाची शिफारस | निविदाकारांचा प्रोव्हिजनल रक्कमेसह देकार (रु. लाखात) | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | खेरवाडी<br>कालावधी - १५ महिने | मे.एम.व्यंकटराव | २५७६.६२<br>(+०.९०%) | तृतीय लघुत्तम मात्र प्रथम लघुत्तमच्या दरापेक्षा कमी दराने |
| २. | दिंडोशी<br>कालावधी - १२ महिने | मे.जे.कुमार | १०३८.६४<br>(-१.०१%) | लघुत्तम |
| ३. | टाईम्स ऑफ इंडिया<br>कालावधी - १५ महिने | मे.अमेय आणि जे.कुमार (जे.व्ही.) | १७०९.१४<br>(-२.११%) | लघुत्तम |
| ४. | सुमन नगर<br>कालावधी - १२ महिने | मे.वालेचा आणि ईसीसीआय (जे.व्ही.) | १६०७.८७<br>(+४.८४%) | द्वितीय लघुत्तम मात्र प्रथम लघुत्तमच्या दरापेक्षा कमी दराने |
| ५. | ठाकूर कॉम्प्लेक्स<br>कालावधी - १५ महिने | मे.अमेय आणि जे.कुमार (जे.व्ही.) | २२३७.७३<br>(-२.११%) | लघुत्तम |
| | | एकूण : | ९१७०.०० | |

बर्फीवाला लेन येथील उड्डाणपुलासाठी फेरनिविदा मागवाव्यात.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१३ : वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर मार्गावर सार्वजनिक जलद वाहतूक यंत्रणेच्या अंमलबजावणीसाठी स्थापन करावयाच्या प्रकल्प अंमलबजावणी पथकातील संचालक श्री.जी.आर.मदान यांचा कंत्राट पध्दतीवरील नेमणूकीचा कालावधी वाढविण्याबाबत.**

**१३.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, कार्यकारी समितीच्या दिनांक १८ मे, २००४ रोजी झालेल्या २०७ व्या बैठकीत अंधेरी-घाटकोपर मार्गावर सार्वजनिक जलद वाहतूक यंत्रणेची अंमलबजावणी करण्यासाठी स्थापन करावयाच्या प्रकल्प अंमलबजावणी पथकामध्ये संचालक या पदावर श्री.जी.आर.मदान यांची सुरुवातीस एक वर्षाच्या करार तत्वावर नेमणूक करण्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली होती. श्री.मदान यांचा करार तत्वावरील नेमणूकीचा कालावधी हा दिनांक ३० जून, २००५ रोजी समाप्त झाला. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर

मार्गावर सार्वजनिक जलद परिवहन प्रकल्प कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने पुढील कामे पार पाडण्यासाठी श्री.मदान यांच्या सेवेची आवश्यकता आहे. म्हणून श्री.मदान यांच्या नेमणूकीचा कालावधी पुढील एक वर्षासाठी म्हणजे दिनांक ३० जून २००६ पर्यंत वाढविण्याचा प्रस्ताव मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांच्या मान्यतेसाठी सादर केला होता. त्यास मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी मान्यता दिली असून श्री.मदान यांच्या नेमणूकीच्या अटी व शर्ती पूर्वीप्रमाणेच राहतील असे निदेश दिले आहेत. त्यानुसार आता हा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या कार्योत्तर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

१३.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.९६९ :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (एक) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर मार्गावर सार्वजनिक जलद वाहतूक यंत्रणेच्या अंमलबजावणीसाठी स्थापन करावयाच्या प्रकल्प अंमलबजावणी पथकामध्ये संचालक या पदावरील श्री.जी.आर.मदान यांच्या नेमणूकीचा कालावधी करार तत्वावर पुढील एक वर्षासाठी म्हणजे दिनांक ३० जून, २००६ पर्यंत वाढविण्यास कार्यकारी समिती याद्वारे कार्योत्तर मंजूरी देत आहे. या कालावधीत श्री.मदान यांना रु.३०,०००/- इतके मासिक वेतन अधिक इतर अनुषंगिक खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी दरमहा रु.५,०००/- तसेच कार्यालयीन वाहन, निवासी दूरध्वनी किंवा मोबाईल या सुविधा देय असतील."

बाब क्र.१४ : वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर मार्गावर सार्वजनिक जलद वाहतूक व्यवस्था (MRTS) राबविण्याबाबतचा सद्यस्थितीचा अहवाल.

१४.१ वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर या मार्गावर सार्वजनिक जलद परिवहन प्रकल्पाच्या अंमलबजावणी संबंधातील सद्यस्थितीची माहिती महानगर आयुक्त यांनी दिली. यासंबंधात चर्चा करताना, या प्रकल्पासाठी कोणत्या प्रकारच्या गेज (Guage) पध्दतीचा वापर केला जाणार आहे अशी विचारणा श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी केली. यासंबंधात माहिती देताना अतिरिक्त महानगर आयुक्त व प्रकल्प

संचालक यांनी असे सांगितले की, या प्रकल्पासाठी दिल्ली मेट्रो रेल महामंडळाने सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला असून या प्रकल्पासाठी स्टॅन्डर्ड गेज पध्दती वापरण्यात यावी अशी शिफारस केली आहे. त्यानुसार प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी जागतिक स्तरावर निविदा मागविण्यात आल्या आहेत. तथापि, गेज पध्दतीसंबंधात केंद्र शासनाच्या नगर विकास मंत्रालयाने निर्णय घ्यावयाचा असून त्यासाठी त्यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. यासंबंधात श्री.सुकथनकर यांनी सूचना केली की, या प्रकल्पाची व्यवहार्यता व एकूण अर्थशास्त्र विचारात घेऊन गेज पध्दतीसंबंधी निर्णय घेण्यात यावा.

१४.२ त्यानंतर, सद्यस्थितीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

<u>बाब क्र.१५</u> : <u>मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत - सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याच्या बांधकामामध्ये येणा-या रेल्वे वरपुलाच्या कामासाठी मध्य रेल्वेस संविधानिक मूल्य अदा करण्याबाबत व त्यास कार्योत्तर मंजुरी देण्याबाबत.</u>

१५.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळातर्फे हाती घेण्यात आले आहे. या जोडरस्त्यामध्ये इतर बाबींबरोबरच मध्य रेल्वेच्या मुख्य मार्गावर कुर्ला स्थानकाजवळ रेल्वे वरपूल, हार्बर मार्गावर कुर्ला डेअरीजवळ रेल्वे वरपूल तसेच मध्य रेल्वेच्या लोकमान्य टिळक टर्मिनलजवळ दुमजली पूल यांचा समावेश आहे. या वरपूलांचे काही काम मध्य रेल्वेच्या हद्दीत करावयाचे आहे. मध्य रेल्वेच्या हद्दीत कामास सुरुवात करण्यासाठी सांविधानिक मूल्य (Nodal charges) म्हणून रु.४.४२ कोटी इतकी रक्कम प्राधिकरणाने अदा करावी असे मध्य रेल्वेने कळविले आहे. तसेच परिरक्षण अनामत (Maintenance deposit) म्हणून रु.१५.०७ कोटी इतकी रक्कम भरण्याबाबतही मध्य रेल्वेने कळविले आहे. या कामाचा खर्च मध्य रेल्वे व प्राधिकरण यांच्यात विभागण्यात यावा अशी विनंती रेल्वे बोर्डास केली आहे. तथापि, रेल्वे हद्दीत काम करण्यास परवानगी मिळण्यासाठी सांविधानिक मूल्य रेल्वेकडे अदा करणे आवश्यक आहे असा रेल्वेने आग्रह धरला आहे. सदर काम तातडीने सुरु करणे आवश्यक असल्यामुळे तसेच सदर कामाचा निविदा देकार ठेकेदारास यापूर्वीच दिलेला असल्याने, मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांच्या मान्यतेने सांविधानिक मूल्य म्हणून रु.४.४२ कोटी इतकी रक्कम प्राधिकरणाने रेल्वेकडे जमा केली आहे. आता हा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या कार्योत्तर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

१५.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :–

ठराव क्र.९७० :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (दोन) व (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याच्या बांधकामामध्ये येणा-या रेल्वे वरपूलाच्या कामासाठी मध्य रेल्वेस सांविधानिक मूल्य म्हणून (Nodel charges) रु.४.४२ कोटी अदा करण्यास कार्योत्तर मंजूरी देत आहे."

**बाब क्र.१६ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्प व मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्प तसेच प्राधिकरणाच्या इतर प्रकल्पांच्या कंत्राटातील तरतूदींनुसार योग्य ती कार्यवाही करण्याचे अधिकार महानगर आयुक्तांना प्रदान करणेबाबत.**

१६.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, या प्राधिकरणामार्फत मोठया प्रमाणावर प्रकल्प अंमलबजावणीची कामे हाती घेण्यात आली असून या अनुषंगाने कंत्राटातील तरतूदींनुसार विविध बाबींवर वेळीच निर्णय घेणे आवश्यक असते. यासंबंधात महानगर आयुक्तांनी कंत्राटदाराच्या नियंत्रणाबाहेरील काही अपरिहार्य कारणामुळे बांधकामाचा कालावधी वाढविण्याच्या आवश्यकतेचा उल्लेख केला. त्यांनी पुढे असेही सांगितले की रस्त्यांचे रुंदीकरण व सुधारणा करताना विकास आराखडयातील रुंदीप्रमाणे लगतच्या मोकळया भूखंडाचा काही भाग कायद्यातील तरतूदीनुसार संपादित करावा लागतो व असे करताना अस्तित्वातील बाधित होणा-या कुंपण भिंतीचे अन्यत्र बांधकाम करावे लागते. तसेच कंत्राटातील तरतूदींप्रमाणे देय होणा-या भाववाढीची अदायगीही वेळोवेळी करावी लागते. अशा सर्व बाबींवरील कार्यवाही करण्याचे अधिकार महानगर आयुक्तांना प्रदान करण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर केला आहे. यासंबंधात महानगर आयुक्तांनी असेही स्पष्ट केले की, प्रकल्पाच्या मंजूर खर्चामध्ये २०% पेक्षा जास्त वाढ होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

१६.२ यासंबंधात चर्चा करताना श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, बांधकामाचा कालावधी निश्चित करताना बांधकामाच्या जागेवरील अतिक्रमणे आदी सर्व

अडचणी विचारात घेऊन कालावधी ठरविण्यात यावा जेणेकरुन बहुतांशी प्रकरणात कालावधी वाढविण्याची आवश्यकता भासणार नाही. यासाठी आवश्यक वाटल्यास एखादी नमूना तपासणी सूचीही करण्यात यावी.

१६.३ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.९७१ :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (५) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी परिवहन प्रकल्प, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प तसेच प्राधिकरणाच्या इतर प्रकल्पांच्या करारनाम्यातील कायदेशीर बाबींमध्ये विशद केलेल्या तसेच बाब टिप्पणीतील परिच्छेद क्र.५ मधील खालील सर्व बाबी संबंधात तसेच कंत्राटातील इतर तरतूदीवर योग्य ती कार्यवाही करण्यास व मंजूरी देण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे :-

(१) कंत्राटाच्या कालावधीस मुदतवाढ देणे, निविदेतील तरतूदीनुसार भाववाढीवरील देयके मंजूर करणे, कंत्राटास मुदतवाढ देण्यासंबंधीची कारणे नस्तीमध्ये नोंदवून ती योग्य असल्यानंतरच महानगर आयुक्त यांच्याकडून मंजूरी देण्यात येईल व कंत्राटदाराच्या देयकामधून नुकसान भरपाई वसूल केल्यास किंवा नुकसान भरपाईपोटी काही रक्कम राखून ठेवल्यास ती रक्कम कंत्राटदारास परत करण्यापूर्वी संबंधित नस्तीवर रक्कम परत करण्याचे पूर्ण स्पष्टीकरण कारणमिमांसासह करणे आवश्यक आहे. महानगर आयुक्त यांना कारणे योग्य वाटल्यास अशी रक्कम कंत्राटदारास परत करण्यात येईल. मूळ कंत्राटास वाढ दिल्यामुळे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या कामाचा कालावधी वाढविणे तसेच त्यांच्या शुल्कात वाढ करणे.

(२) मुंबई नागरी परिवहन प्रकल्प व मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांची अंमलबजावणी करताना काही ठिकाणी कंत्राटात नमूद नसलेल्या अतिरिक्त बाबी (Extra items) उपस्थित झाल्यास किंवा कंत्राटातील बाबींच्या परिमाणामध्ये वाढ झाल्यास (Excess Quantity) त्यांची देयके देणे. परंतू सदर कामात होणा-या बचतीचा अंदाज घेऊन नंतरच याबाबत विचार करण्यात यावा जेणेकरुन कामाच्या खर्चामध्ये मंजूर रक्कमेच्या २०% पेक्षा जास्त वाढ होणार नाही.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम २९९ प्रमाणे इमारतींच्या प्रांगणातील खुली जागा रस्त्याच्या बांधकाम प्रयोजनात घेणे व त्यासाठी आवश्यक भिंतीच्या कुंपणाचे पुनर्बांधकाम व अन्य सुविधा उदा.गटारे, जलवाहिन्या इत्यादी सुविधांचे स्थलांतर करण्यावरील खर्चास मंजूरी देणे.

(४) ॲडज्युडीकेटर, आर्बीट्रेटर, डिस्प्युट रिझोल्युशन बोर्ड व संबंधित तज्ञांची, वकिलांची करारातील अटीनुसार नेमणूक करणे व संबंधित तज्ञ / सल्लागारांची एक सूची तयार करुन त्यांच्या अटी व शर्ती तसेच मोबदला निश्चित करणे व त्यास मंजूरी देणे.

(५) मुंबई नागरी परिवहन प्रकल्प व मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत बांधलेल्या सदनिकांचा विकासकाकडून ताबा घेतल्यापासून ते प्रकल्पग्रस्तांना प्रत्यक्ष ताबा देण्यापर्यंतचे पाणीपुरवठा व विद्युत देयकांवरील खर्च भागविणे.

(६) करारामध्ये जेथे वृक्ष तोडण्यासाठी अनामत रक्कम भरण्याची तरतूद नाही व प्रकल्प राबविण्यासाठी वृक्षरोपण / वृक्ष पुनर्रोपण करण्याची तरतूद नाही इत्यादी खर्चास मंजूरी देणे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील बाबींमुळे होणारा वाढीव खर्च संबंधित कामांच्या मंजूर निधी स्त्रोतातून भागविण्यास कार्यकारी समिती याद्वारे मान्यता देत आहे."

**बाब क्र.१७ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामध्ये प्रमुख नियोजक (प्रकल्प) हे पद भरण्याबाबत. (गोपनीय)**

१७.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, जानेवारी, २००३ मध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ मध्ये सुधारणा करण्यात आल्यानंतर मुंबईतील पायाभूत सुविधांची कामे प्राधिकरणाने मोठया प्रमाणात हाती घेतली आहेत. तसेच घारापूरी बेटाचा विकास, बी.डी.डी. चाळीचा पुनर्विकास, विक्रांत बोटीचे संग्रहालयात रुपांतर करणे, प्राधिकरणाच्या विविध प्रकल्पांमुळे बाधित होणा-या कुटुंबांचे पुनर्वसन इत्यादी कामे प्राधिकरणाने हाती घेतली आहेत. त्यासाठी आता प्राधिकरणामध्ये प्रकल्प विभागाची आवश्यकता भासू लागली आहे. त्या अनुषंगाने प्राधिकरणामध्ये प्रमुख नियोजक (प्रकल्प) हे पद निर्माण करणे आवश्यक झाले आहे. यासंबंधात मा.मुख्य सचिव व मा.मुख्यमंत्री यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यामध्ये असे प्रस्तावित केले होते की, प्राधिकरणातील प्रवर्तन संशोधन विशेषज्ञ या रिक्त असलेल्या पदाची श्रेणीवाढ करुन हे पद प्रमुख

नियोजक (प्रकल्प) म्हणून निर्माण करण्यात यावे व त्यासाठी प्राधिकरणातील इतर विभाग प्रमुखांच्या वेतनश्रेणीप्रमाणे सदर पदाची वेतनश्रेणी असावी. तसेच प्राधिकरणातील अधिका-यांना पदोन्नतीची संधी मिळावी म्हणून सदर पद पदोन्नतीने भरण्याबाबत शिफारस केली होती. सदर प्रस्तावास मा.मुख्य सचिव व मा.मुख्यमंत्री यांनी मान्यता दिलेली आहे. आता प्रमुख नियोजक (प्रकल्प) या पदासाठी प्रस्तावित केलेली शैक्षणिक पात्रता व अनुभव आणि सेवाप्रवेश नियम कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर केले आहेत. तसेच प्रस्तावित सेवाप्रवेश नियमानुसार वरिष्ठ नियोजक संवर्गातील जेष्ठ अधिका-यांमधून सदर पद पदोन्नतीने भरण्याकरीता गठीत केलेल्या पदोन्नती समितीसही मान्यता देण्यासंबंधी कार्यकारी समितीस विनंती करण्यात आली आहे. श्री.के.आर.घोरपडे, वरिष्ठ नियोजक हे प्रमुख नियोजक (प्रकल्प) या नव्याने निर्माण करावयाच्या पदास आवश्यक असलेली प्रस्तावित शैक्षणिक पात्रता व अनुभव पूर्ण करीत असल्यामुळे तसेच ते प्राधिकरणामध्ये वरिष्ठ नियोजक संवर्गामध्ये जेष्ठ असल्यामुळे त्यांची प्रमुख नियोजक (प्रकल्प) या पदावर, प्राधिकरण व शासन प्रमुख नियोजक (प्रकल्प) हे पद निर्माण करण्यास मान्यता देईल या सापेक्ष, रु.१६,४००-४५०-२०,००० या वेतनश्रेणीत नियुक्ती करण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.

१७.२ यासंबंधात श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी विचारणा केली असता महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्रमुख नियोजक (प्रकल्प) हे पद निर्माण करण्यास प्राधिकरणाने व शासनाने मान्यता दिल्यानंतर सदर विभागासाठी आवश्यक असलेला इतर अधिकारी व कर्मचारीवर्ग हा सध्या प्राधिकरणाकडे उपलब्ध असलेल्या कर्मचारीवर्गामधून घेण्यात येईल. नवीन पदे निर्माण करण्यात येणार नाहीत. तसेच आवश्यकता भासल्यास काही कामे आऊट सोर्स करण्यात येतील.

१७.३ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :—

<u>ठराव क्र.९७२</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या व शासनाच्या मान्यतेच्या अधिन राहून तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम,

१९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (एक) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे —

(१) प्राधिकरणामधील रु.१२,०००-३७५-१६,५०० या वेतनश्रेणीतील रिक्त असलेले प्रवर्तन संशोधन विशेषज्ञ (ORS) हे पद श्रेणीवाढ करुन रु.१६,४००-४५०-२०,००० या वेतनश्रेणीत प्रमुख नियोजक (प्रकल्प) या पदामध्ये रुपांतरीत करण्याच्या प्रस्तावाची शिफारस प्राधिकरणास करीत आहे.

(२) सदर पदासाठी खालील प्रस्तावित केलेली शैक्षणिक पात्रता, अनुभव व सेवाप्रवेश नियम, तसेच सदर पदासाठी महानगर आयुक्त यांनी गठीत केलेल्या, महानगर आयुक्त, अतिरिक्त महानगर आयुक्त व प्रकल्प संचालक आणि मुख्य लेखाधिकारी व वित्त सल्लागार यांचा समावेश असलेल्या पदोन्नती समितीस कार्यकारी समिती मान्यता देत आहे.

<u>प्रमुख नियोजक (प्रकल्प) या पदाचे प्रस्तावित सेवाप्रवेश नियम</u>

प्रमुख नियोजक (प्रकल्प) हे पद प्राधिकरणातील वरिष्ठ नियोजक या पदावर कार्यरत असलेल्या शैक्षणिक अर्हता व अनुभवाची अट पूर्ण करीत असलेल्या अधिका-यांना पदोन्नती देऊन भरण्यात यावे.

<u>आवश्यक अर्हता</u> : १) वास्तुशास्त्र किंवा स्थापत्य अभियांत्रिकी किंवा भूगोल या विषयातील किंवा सामाजिक शास्त्र या विषयातील पदव्युत्तर पदवी.

आणि

२) नगर रचना किंवा नगर नियोजन किंवा नगर आणि प्रादेशिक नियोजनामधील पदव्युत्तर पदवी / पदविका

<u>अनुभव</u> : पदव्युत्तर पदवी धारण केल्यानंतर किमान १५ वर्षाचा नगर रचना/प्रादेशिक नियोजन क्षेत्रात काम केल्याचा अनुभव आवश्यक. त्यापैकी किमान ७ वर्षे वरिष्ठ नियोजक किंवा उप-संचालक, नगर रचना किंवा तत्सम पदावर काम केलेले असावे.

(३) श्री.के.आर.घोरपडे, वरिष्ठ नियोजक हे प्रमुख नियोजक (प्रकल्प) या नव्याने निर्माण करण्यात येणा-या पदास आवश्यक असलेली शैक्षणिक पात्रता व अनुभव पूर्ण करीत असल्यामुळे तसेच ते प्राधिकरणामध्ये वरिष्ठ नियोजक संवर्गामध्ये जेष्ठ असल्यामुळे त्यांची प्रमुख नियोजक (प्रकल्प) या पदावर, प्राधिकरण व शासन प्रमुख नियोजक (प्रकल्प) हे पद निर्माण करण्यास मान्यता देईल या सापेक्ष, रु.१६,४००-४५०-२०,००० या वेतनश्रेणीत नियुक्ती करण्यास मान्यता देत आहे.

**“असाही ठराव करण्यात येत आहे की,** या संबंधीत आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.”

**पटल बाब : वांद्रे-कुर्ला संकुलातील भूखंडधारकांच्या बांधकाम क्षेत्राविषयक हस्तांतरण धोरणामध्ये सुधारणा करणेबाबत.**

या बाब टिप्पणीसंबंधात माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाने राष्ट्रीय शेअर बाजार मर्यादित या संस्थेस वाटप केलेल्या १५,८०४.७३ चौ.मी. क्षेत्राच्या “जी” ब्लॉकमधील भूखंडावर सदर संस्थेच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊन इमारतीचा वापरही सुरु झालेला आहे. राष्ट्रीय शेअर बाजार या संस्थेने त्यांच्या वरील भूखंडावर बांधलेल्या इमारतीमधील एकंदर क्षेत्राच्या ३८.०८% इतके बांधकाम क्षेत्र प्राधिकरणाच्या धोरणानुसार इतर पात्र संस्थांस महानगर आयुक्तांच्या पूर्व परवानगीने हस्तांतरीत केले आहे. प्राधिकरणाच्या सध्याच्या धोरणानुसार वाटपग्राही संस्था त्यांच्या भूखंडावरील इमारतीतील एकंदर बांधकाम क्षेत्राच्या ४०% पर्यंतच बांधकाम क्षेत्र इतर संस्थांस हस्तांतरीत करु शकते. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, राष्ट्रीय शेअर बाजार या संस्थेने मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांस अशी विनंती केली आहे की, सदर संस्थेच्या कार्यालयीन इमारतीमधील एकूण बांधकाम क्षेत्रापैकी प्राधिकरण अनुज्ञेय करत असलेल्या ४०% इतक्या क्षेत्राऐवजी ५०% इतके बांधकाम क्षेत्र इतर पात्र संस्थेस हस्तांतरीत करण्यास परवानगी मिळावी.

यासंबंधात, प्राधिकरणाच्या हस्तांतरण धोरणाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाने दिनांक २७ नोव्हेंबर, १९९७ रोजी झालेल्या बैठकीत हस्तांतरणाबाबत असे धोरण ठरविले होते की, वाटपग्राही आपल्या भूखंडावरील इमारतीतील ४०% पर्यंतचे बांधकाम क्षेत्र इतर पात्र संस्थांस महानगर आयुक्तांच्या पूर्व परवानगीने हस्तांतरीत करु शकतील. परंतु प्राधिकरणाच्या दिनांक १ सप्टेंबर, २००३ पासून अंमलात आलेल्या हस्तांतरण विषयक सुधारीत धोरणानुसार व्यावसायिक विकासकांव्यतिरिक्त अन्य निविदाकार इमारत पूर्ण झाल्यापासून ५ वर्षात ४०% पर्यंत बांधकाम क्षेत्र महानगर आयुक्तांच्या पूर्व परवानगीने हस्तांतर करु शकतात तसेच ५ वर्षानंतर उर्वरित ६०% क्षेत्र महानगर आयुक्तांच्या पूर्व परवानगीने हस्तांतर करु शकतात. मात्र आता जागतिकीकरणामुळे अत्याधुनिक कार्यालयीन सामुग्रीची उपलब्धता व नव्या पध्दती यामुळे कार्यालयीन जागेची गरज कमी होत

चाललेली आहे. तसेच प्राधिकरणाच्या भाडेपट्टाधारकांमधील व्यावसायिक विकासकांना १००% बांधकाम क्षेत्र हस्तांतरीत करण्यास परवानगी आहे. या गोष्टींचा विचार करता व्यावसायिक विकासकांव्यतिरिक्त अन्य निविदाधारक तसेच पूर्वीचे सर्व निविदाधारक यांनी बांधलेल्या इमारतीमधील बांधकाम क्षेत्र हस्तांतरणाबाबत प्राधिकरणाच्या धोरणामध्ये सुधारणा करणे गरजेचे आहे. सध्या प्राधिकरणाचे हस्तांतरण शुल्क, हस्तांतरण अभिलेख्यावरील मुद्रांक शुल्कावर आधारित आहे. अलीकडे मुद्रांक शुल्कात कपात झाली आहे. याचा विचार करता काही कमीत कमी (minimum) प्रमाणात शुल्क आकारणे तसेच हस्तांतरणाच्या विनंतीवरील कार्यवाहीसाठी प्रक्रिया शुल्क आकारणे आवश्यक आहे.

यासंबंधात चर्चा झाल्यानंतर कार्यकारी समितीने असे ठरविले की, सर्वच हस्तांतरणाचे वेळी प्राधिकरणास काही शुल्क आकारणी करणे शक्य होईल याबाबत सर्वांगिण विचार करुन शुल्क आकारणी करण्याबाबतचे सुधारीत धोरण व त्या अनुषंगाने प्रस्ताव कार्यकारी समितीच्या पुढील बैठकीत विचारार्थ व प्राधिकरणास शिफारस करण्यासाठी सादर करण्यात यावा. अर्जदार राष्ट्रीय शेअर बाजार यांच्या ५०% पर्यंत बांधकाम क्षेत्र हस्तांतरणास परवानगी देण्याच्या विनंतीबाबत कार्यकारी समितीने असे ठरविले की, शुल्क आकारणीबाबतच्या प्रस्तावित सुधारीत धोरणाच्या अंमलबजावणीमुळे जर अर्जदार संस्थेस काही शुल्क प्राधिकरणाकडे भरणे आवश्यक झाले तर ते शुल्क भरण्यास सदर संस्थेची तयारी असण्यासापेक्ष संस्थेने मागितलेली हस्तांतरणाबाबतची परवानगी देण्याचा विचार करावा अशी शिफारस प्राधिकरणास करण्यात यावी.

त्यानंतर, मा. अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

—— oooooooooo ——